# ई - पोलीस पत्रिका

दि.०१/१०/२०२४ अनु.क्र.१७८

## (अमरावती शहर पोलीसांची२०२४ ची उद्दिष्टे)

- नागरिकांशी मित्रत्वाचे संबध.
- उच्च मनोबल युक्त व तणाव मुक्त पोलीस दल.
- महिला, मुले व ज्येष्ठ नागरिकांची सुरक्षा.
- जातीय सलोखा वाढविणे.
- संघटित गुन्हेगारी आणि आतंकवादी यांचे विरूद्ध कठोर कारवाई.
- रस्त्यावरील गुन्हेगारीवर नियंत्रण/सुरक्षा.
- पोलीस कोठडीत गुन्हे घडू नदेणे.
- आरोपी पोलीसांचेताब्यातून पळून जाऊ नयेत.
- “सुरक्षित व सुखकर अमरावती” हा आमचा संकल्प आम्ही व्यापक लोकसहभागातून साध्य करू.

# भाग-१

## पदोन्नती/बदली/प्रशिक्षण/रजा

## बदली

**१.पोआअ/पशा-१/पो.अधि./अति.कार्यभार/८६५५/२०२४ अमरावती शहर दिनांक ३०/०९/२०२४**

## आदेश

श्रीमती दिप्ती हरिभाऊ ब्राम्हणे, पोलीस निरीक्षक, नेमणुक महिलासेल, अमरावती शहर यांचेकडेपुढील आदेशा पर्यंत, प्रशासकीय कारणास्तव, तात्पुरत्या स्वरुपात पोलीस निरीक्षक, पो.स्टे. सायबर, अमरावती शहर शहरया पदाचा अतिरिक्त कार्यभार सोपविण्यात येत आहे.

## पदोन्नती

**१.पोआअ/आस्था-प्रलि/पोना ते पोहवा पदोन्नती/८३४९/२०२४ अमरावती शहर दिनांक १३/०९/२०२४**

## आदेश

पोलीस आयुक्त, अमरावती शहर आस्थापेनरील खालील नमुद पोलीस नाईक (अराजपत्रीतगट-क) यांना महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय, क्रमांक :- बीसीसी 2018/प्र.क.366/16-ब, दिनांक 07.05.2021 अन्वये मा.सर्वोच्च न्यायालयाच्या विशेष अनुमती याचिकाक्रमांक 28306/2017 वरील अंतिम निर्णयाच्या अधिन राहून दिनांक 25.05.2004 रोजीच्या स्थितीनुसार सेवाज्येष्ठतेने खालील अटीचे अधिन राहून पोलीस हवालदार (अराजपत्रीतगट-क) या पदावर वेतन संरचना वेतन स्तर एस-9, रु.26400-83600/- अधिक विशेष वेतन रु.750/- मध्ये दिनांक 4.9.2024 पासुनतात्पुरती पदोन्नती देण्यात येत आहे.

| पदनाम | वेतनस्तर | विशेष वेतन |
|---|---|---|
| पोलीस हवालदार | एस-9, रु.26400-83600/- | विशेष वेतन रु. 750/- |
| पोलीस नाईक | एस-8, रु.25500-81100/- | विशेष वेतन रु. 750/- |

| अ.क्र. | पदनाम | ब.क्र. | पोलीस अंमलदाराचे नांव | जात/प्रवर्ग | पदोन्नती दिलेला प्रवर्ग |
|---|---|---|---|---|---|
| 1. | पोना | 23 | राजाभाऊ जनार्धन राऊत | माळी/इमाव | ज्येष्ठतेनुसारखुला |

1. उपरोक्त पोलीस अंमलदारा विरुध्द विभागीय चौकशी/ प्राथमिक चौकशी सुरु असेल किवा न्यायालयात खटला चालू असेल किवा न्यायालयाने दिलेल्या इतर निर्णया विरुध्द वरीष्ठ न्यायालयात अपिल प्रलंबित असेल किवा ते एखादी शिक्षा भोगत असतीलतर त्यांना पदोन्नती न देता सविस्तर अहवाल या कार्यालयास तात्काळ सादर करावा. तसेच वरील प्रमाणे पदोन्नती दिल्यानंतर मागावून कोणतीही प्रतिकुल बाब निदर्शनास आल्यास संबधित अंमलदारास देण्यात आलेल्या पदोन्नतीचे पदावरुन तात्काळ पदावनत करण्यात येईल. तसेच उपरोक्त अंमलदारांपैकी ज्या अंमलदारांनी मार्च 2023 अखेरचे मत्ता व

दायीत्व विवरणपत्र या कार्यालयास सादर केलेले नाहीत.अशा पोलीस अंमलदार यांनी तात्काळ मत्ता व दायीत्व विवरणपत्र सादर करावे.

2. पदोन्नत झालेले पोलीस हवालदार यांचे अभिनंदन व शुभेच्छा.

## भाग-२

## शिक्षा/निलंबन/पुन्हा स्थापना/बक्षिस/सेवानिवृत्त/मयत/नाव कमीकरण

## निरंक

## भाग-३

## वेतन/संरचना/वेतन निश्चिती/वार्षीक वेतनवाढ/संकीर्ण

## वेतन निश्चिती

**०१.पोआअ/आस्था-३/सु.वे.नि./सपोउपनि-१ खांडेकर/८६६२/२०२४ अमरावती शहर दिनांक ३०/०९/२०२४**

### आदेश

**सपोउपनि/१, अशोक भगवंतराव खांडेकर,नेमणूक पो.स्टे.कोतवाली, अमरावती शहर**हे दिनांक ३१.०५.२०२५ रोजी नियत वयोमाननुसार सेवानिवृत्त होणार आहेत. त्यांचे वेतनात तफावत असुन त्यांना या कार्यालयाचे आदेशक्र. पोआअ/प्रलि-आस्था/पोहवा तेसपोउपनि पदोन्नती/६३६७/२०२४, दिनांक १४.०८.२०२४ अन्वये पोलीस हवालदार पदावरुन सहायक पोलीस उपनिरीक्षक या पदावर पदोन्नती देण्यात आलेली आहे.

त्या अनुषंगाने **सपोउपनि/१, अशोक भगवंतराव खांडेकर,** यांची शासन अधिसुचना, वित्त विभाग, क्र.वेपुर-२०१९/प्र.क्र./सेवा-९, दिनांक ३०.०१.२०१९ अन्वये महाराष्ट्र नागरी सेवा सुधारीत वेतन नियम २०१९ मधील तरतुदीप्रमाणेव महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम, १९८१ मधील नियम ११ (१) (ए) तसेच महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम २०१९ मधील नियम १३ अन्वये सातव्या वेतन आयोगानुसार पदोन्नतीच्या पदाची खालील प्रमाणे सुधारीत वेतन निश्चितीकरण्यात येत आहे.

| पदनाम | वेतनस्तर | पे मॅट्रीक्स |
|---|---|---|
| पोलीस नाईक | एस-८ | रु.२५५००-८११००/- |
| पोलीस हवालदार | एस-९ | रु.२६४००-८३६००/- |
| सहायक पोलीस उपनिरीक्षक | एस-१० | रु.२९२००-९२३००/- |

| वेतनवाढीचा दिनांक | विद्यमान पे मॅक्ट्रीक्स लेव्हल नुसार वेतननिश्चती | वेतनवाढीचा दिनांक | सुधारीत पे मॅक्ट्रीक्स लेव्हल नुसार वेतननिश्चती |
|---|---|---|---|

| | | | |
|---|---|---|---|
| ०१/०७/२०२० | रु.४३५००/- एस-८ | ०१/०७/२०२० | रु.४३५००/- एस-८ |
| | | २२/०३/२०२१ | रु.४३६००/- एस-९<br>**पोहवा पदोन्नती झाल्याने विकल्पानुसार दि.२२.०३.२०२१ ते ३०.०६.२०२१ कालावधीतील अनुज्ञेय वेतन.** |
| ०१/०७/२०२१ | रु.४४८००/- एस-८ | ०१/०७/२०२१ | रु.४६२००/- एस-९<br>**नियम ११ (१)(अ) नुसार पदोन्नतीच्या पदाची वेतननिश्चिती.** |
| ०१/०७/२०२२ | रु.४६१००/- एस-८ | ०१/०७/२०२२ | रु.४७६००/- एस-९ |
| ०१/०७/२०२३ | रु.४७५००/- एस-८ | ०१/०७/२०२३ | रु.४९०००/- एस-९ |
| ०१/०७/२०२४ | रु.४८९००/- एस-८ | ०१/०७/२०२४ | रु.५०५००/- एस-९ |
| | | १४/०८/२०२४ | रु.५२०००/- एस-९<br>**सपोउपनि पदोन्नती झाल्यानेविद्यमान पदावर मानीव वेतनवाढ**<br>**निमय ११ (१)(अ) नुसार पदोन्नतीच्या पदाची वेतननिश्चिती. रु.५२६००/-एस-१०** |

प्रस्तुत प्रकरणी करण्यात आलेल्या सुधारीत वेतननिश्चितीमुळे अनुज्ञेय असणारी थकबाकी वेतनात रोखीन अदाकरण्यात यावी. तसेच सदरची वेतन निश्चितीही वेतन पडताळणी पथक यांचे अतिम तपासणीचे अधीन राहूनकरण्यात आली असून भविष्यात रकमेचे अतिप्रदान झाल्याचे निदर्शनास आल्यास सदर अतिप्रदानाची रक्कम त्यांचे कडून वसूल करण्यात येईल.

**०२.पोआअ/आस्था - वेनिलि/पदोन्नती पोना ते पोहवा/८६६३/२०२४ अमरावती शहर दिनांक ३०/०९/२०२४**

## +Énä¶É

**पोलीस नाईक/२३, राजाभाऊ जनार्दन राऊत, नेमणूक पो.स्टे.फ्रेजरपुरा, अमरावती शहर** यांना याकार्यालयाचे आदेश क्र.पोआअ/आस्था-प्रलि/पोनाते पोहवा पदोन्नती/८३४९/२०२४, दि.१३.०९. २०२४ अन्वये **दिनांक ०४.०९.२०२४ या दिनांका पासुन** पोलीस नाईकते पोलीस हवालदार (अराजपत्रीतगट-क) या पदावर पदोन्नती देण्यात आल्याने त्यांची वेतन निश्चिती महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम, १९८१ मधील नियम ११ (१) (ए) तसेच महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम २०१९ मधील नियम १३ अन्वये सातव्या वेतन आयोगानुसार पदोन्नतीच्या पदाची वेतननिश्चिती पुढीलप्रमाणे मंजुर करण्यात येत आहे.

| पदनाम | वेतनस्तर | वेतनश्रेणी |
|---|---|---|
| पोलीस नाईक | एस-८ | रु.२५५००-८११००/- |
| पोलीस हवालदार | एस-९ | रु.२६४००-८३६००/- |

| तपशिल | सुधारीत वेतन स्तर मधील वेतन व वेतनवाढीचा दिनांक |
|---|---|
| पोलीस नाईक पदावरील **वेतनस्तर एस-८** मधील दि.०१.०७.२०२४ चे वेतन | **रु. ३९८००/-** |
| दिनांक४.०९.२०२४ रोजी पोलीस हवालदार पदावर पदोन्नती झाल्याने पोलीस नाईक पदामध्ये वेतनस्तर एस-८ मध्ये एक मानिव वेतनवाढ दिल्यानंरचे वेतन. | **रु.४१०००/-** |
| पोलीस हवालदार या पदोन्नतीचे पदावर वेतनस्तर **एस-९** मध्ये नियम ११ (एक) (ए) नुसार दिनांक०४.०९.२०२४ रोजी पदोन्नतीच्या पदाची वेतननिश्चिती. | **रु.४११००/-** |

**(कल्पना बारवकर)**
पोलीस उपायुक्त (मुख्या.)
अमरावती शहर

प्रति,

पत्रव्यहार शाखा/सेवापट नोंदणी लिपीक/सीसीटीएनएस